# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

*महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित*
*औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.*

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


No,CGRF/AZ/ U / 238 / 2009 /72 / Date :-

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Pandit Jaising Rathod, New Hanuman Nagar, Galli No.4, Near Water Tank, Aurangabad. (Consumer no. 490011343144)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Pandit Jaising Rathod, New Hanuman Nagar, Galli No.4, Near Water Tank, Aurangabad.*

*The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of incorrect bill issued by Distribution Licensee.*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 04.08.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:-*

*Shri Pandit Jaising Rathod,*
*New Hanuman Nagar, Galli No.4,*
*Near Water Tank,*
*Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२३८/२००९/७२**

**तक्रार दाखल दिनांक :- ३०/०७/२००९**
**निकाल दिनांक :- ०३/०९/२००९**

**श्री पंडीत जयसिंग राठोड,**
**न्यु हानुमान नगर, गल्ली नंबर ४,**
**पाण्याच्या टाकीमागे,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११३४३१४४) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ३०/०७/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०४/०८/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी विद्युत पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००११३४३१४४ आहे.ग्राहकाचे मिटर बदली झाल्यानंतर त्यांना माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेबर २००७ या महिन्यात अवास्तव व चुकीचे वीज देयक देण्यात आले.त्याबाबत त्यांनी महावितणच्या संबंधित कार्यालयात तक्रार दाखल केली.परंतु त्यांना सुधारीत वीज देयक मिळाले नाही.ग्राहकाने दिनांक २५/०१/२००८ रोजी १८६०/- रुपये वीज बिल भरणा केले त्यानंतर रुपये १४२५/-चा भरणा केलेला आहे परंतु त्याची कोठेही नोंद घेण्यात आली नाही.ग्राकाने वारंवार येणा-या चुकीच्या वीज बिलाबाबत महावितरणच्या संबंधित विभागाकडे अनेकदा तक्रारी केल्या परंतु वीज बिल दुरुस्त करु मिळाले नाही याउलट कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांचा वीज पुरवठा दिनांक २९/०७/२००९ रोजी खंडीत करण्यात आला. ग्राहकाने या मंचासमोर तक्रार दाखल करुन सुधारीत वीज बिल मिळण्याबाबत,व्याज व दंड माफ करण्याबाबत व मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणुन रुपये ५००/- मिळण्याबाबत विनंती केली आहे.

२) दिनांक ०४/०८/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री जी.एस. राठौर व ग्राहक श्री पंडीत राठोड उपस्थित होते. वीज ग्राहक यांनी माहे ऑगस्ट २००७ मध्ये रुपये ३९२६०/- रुपयाचे अवास्तव व चुकीचे देयक प्राप्त झाल्याबाबत सांगितले.वीजपोटी रुपये १४२५/- चा भरणा माहे आक्टोबर मध्ये केला परंतु त्याची नोंद घेण्यात आली नसल्याचे व सुधारीत देयक आज पर्यंत मिळाले नसल्याचे प्रतिपादन केले. नोडल अधिकारी यांनी

ग्राहकाचे सी.पी.एल. दाखल करुन माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेबर २००७ मध्ये देण्यात आलेल्या वीज देयकाची दुरुस्ती करुन त्याबाबत रुपये ३४६७२=७३/- ची वजावट माहे डिसेबर २००७ केल्याचे नमुद केले.ग्राहकाने दिनांक २५/०१/२००८ पासुन कोणतेही वीज देयक न भरल्यामुळे त्यांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आल्याचे सांगितले.मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकास रुपये २०००/- चे तात्पुरते देयक देवुन त्याचा भरणा केल्यानंतर विद्युत पुरवठा २४ तासात सुरु करण्याबाबतचा आदेश दिला. नोडल अधिकारी यांना मिटर बदली अहवाल,स्थळ निरिक्षण अहवाल व आधीकेलेली बिल रिव्हीजन सीट सादर करण्याचे सांगुन पुढील सुनावणी दिनांक ११/०८/२००९ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ११/०८/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री पी.आर.तौर व वीज ग्राहक उपस्थित होत.नोडल अधिकारी यांनी मंचाचे आदेशानुसार रुपये २०००/- चा भरणा करुन घेऊन ग्राहकाचा वीज पुरवठा चालु केल्याचे सांगितले व मंचाने मागितलेली कागदपत्रे संबंधित उपविभागाकडुन प्राप्त झाली नसल्यामुळे तक्रारीच्या सुनावणीस पुढील तारीख देण्याबाबत मंचास विनंती केली.मंचाने त्यांची विनंती मान्य करीत पुढील सुनाणीची तारीख १८/०८/२००९ रोजी ठेवली.

३) दिनांक १८/०८/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचा स्थळ निरिक्षण अहवाल, मिटर चाचणी अहवाल व वीज बिल दुरुस्ती सीट मंचास सादर केली. ग्राहकाने त्याचे घर झोपडपट्टी विभागात असुन फक्त दोन खोल्याचे आहे व त्यामध्ये बल्बा व छोटा टी.व्ही.असा वीज वापर असल्यामुळे देण्यात आलेले वीज बिल अवास्तव असल्याचे सांगितले. दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुण घेतल्या नंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

दोन्ही बाजुकडुन दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आसे आढळुन येते की, ग्राहकाचे मिटर माहे मार्च २००७ रोजी बदली करुन त्याठिकाणी नविन मिटर क्रमांक ९००५०५४५९६ बसविण्यात आले. सी.पी.एल. वरुन ग्राहकास माहे जुलै,ऑगस्ट व सप्टेबर २००७ मध्ये अनुक्रमे २०९६,१८७६,१८९७ युनिटची वीज देयके देण्यात आल्याचे आढळुन येते. वरील अवास्तव देयकाबाबत ग्राहकाने तक्रार दाखल केल्यानंतर त्याचे वरील मिटर बदली करुन त्याची दिनांक २०/११/२००७ रोजी चाचणी करण्यात आली. चाचणी अहवालानुसार वरील मिटर अवास्तव जलद गतीने *( Abnormal Fast)* फिरत असल्याचे आढळुन आले कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक २६/११/२००७ रोजी ग्राहकाचे स्थळ निरिक्षण करुन वरील मिटर नादुरुस्त असल्याचे सांगुन ग्राहकाचा वीज वापर ७५ युनिट प्रति माह असल्याचा अहवाल सादर केला आहे.

त्यामुळे वरील कालावधी करीता ग्राहकाचा वीज वापर सरासरी ७५ युनिट प्रति माह गृहीत धरुन बिल दुरुस्त करण्यात आले व रुपये ३४६७२/- चे क्रेडीट माहे डिसेंबर २००७ मध्ये देण्यात आल्याचे दिसुन येते. तसेच माहे नोव्हेबर २००७ ते मे २००८ या कालावधीत सुध्दा मिटर लॉक दाखवुन अवास्तव देयके देण्यात आल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी यांनी सी.पी.एल.नुसार माहे जानेवारी २००९ मध्ये ग्राहकास व्याज व दंडाची रक्कम कमी केल्याचे प्रतिपादन केले आहे परंतु प्रत्यक्षात वरील रक्कम सी.पी.एल. वर दाखविण्यात आली असुन त्याचे क्रेडीट देण्यात आलेले नाही. ग्राहकाने माहे ऑक्टोबर २००८ मध्ये रुपये १४२५/- वीज देयक भरणा केल्याचे प्रतिपादन केले परंतु त्याबाबत रक्कमेची पावती अथवा भरणा केल्याची नक्की तारीख मंचासमोर सादर करु शकले नाही.

वरील सर्व बाबीचे निरीक्षणावरुन असे आढळुन येते महावितरणतर्फे वीज ग्राहकास माहे जुलै २००७ ते मे २००८ याकालावधीत अवास्तव व चुकीची देयके देण्यात आली आहेत. त्यामुळे ग्राहकाची तक्रार मान्य करुन खालील आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

१) महावितरणतर्फे ग्राहकास देण्यात आलेली माहे जुलै २००७ ते मे २००८ पर्यंतची सर्व देयके रद्द करण्यात येत असुन त्याऐवजी ग्राहकास वरील कालावधीकरीता ७५ युनिट प्रति माह प्रमाणे फेर आकारणी करुन सुधारीत देयक ३० दिवसाच्या आत द्यावे.

२) वरील कालावधीत ग्राहकाने यापुर्वी भरणा केलेले वीज देयक, व मंचाचे आदेशानुसार भरणा केलेली रक्कम रुपये २०००/- ची वजावट सुधारीत वीज देयकातुन करावी.

३) सुधारीत देयक देतांना व्याज व दंडची आकारणी करु नये.महावितरण कंपनीने वरील आदेशाचे पालन करुन संपुर्ण अहवाल सुधारीत वीज देयकासह ३० दिवसांच्या आत मंचात सादर करावा.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२३८/२००९/७२** **दिनांक :-**

**प्रति,**

श्री पंडीत जयसिंग राठोड,
न्यु हानुमान नगर, गल्ली नंबर ४,
पाण्याच्या टाकीमागे, औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११३४३१४४)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२३८/२००९/७२ )

आपण दिनांक ३०/०७/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.